# *महाराष्ट्र विधानसभा*

## *दिवसाच्या कामकाजाचा क्रम*
## *मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७*
## *(सकाळी ११.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे.*

*दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).*

*तीन : अध्यक्ष, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करतील*

*चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-*
*"तालब चौक, कोंढवा बुद्रुक (जि.पुणे) येथील ॲव्हेन्यु गृहसंकल्प इमारतीमधील 'बेक्स-एन-केक्स' या बेकरीस दि. ३० डिसेंबर, २०१६ रोजी लागलेल्या भीषण आगीत सहा कामगारांचा गुदमरुन झालेला मृत्यू, बेकरी मालकाच्या निष्काळजीपणामुळे सदरहू घटना घडणे, बेकरीसाठी आवश्यक असलेला अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना बेकरीकडे नसल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी कोंढवा पोलीसांनी तीन भागीदार मालकांवर गुन्हा दाखल करण्यात येवूनही अद्याप त्यांच्या विरुध्द पुढील कोणतीच कारवाई न करता प्रकरण दडपविण्याचा घडलेला प्रकार, मृत कामगारांच्या कुटुंबियांना देखील अद्याप कोणतीही आर्थिक मदत देण्यात न आल्याने मृत कामगारांच्या कुटुंबियांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(२) सर्वश्री. अतुल भातखळकर, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, कुमारी प्रणिती शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड,श्रीमती निर्मला गावित,ॲड. यशोमती ठाकूर,सर्वश्री. अस्लम शेख, अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ,राहुल बोंद्रे, डॉ. संतोष टारफे,प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. मो.आरिफ नसीम खान, अब्दुल सत्तार, अमित देशमुख,कालीदास कोळंबकर, पृथ्वीराज चव्हाण,डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री.संग्राम जगताप, जयकुमार गोरे, बाळासाहेब थोरात,संग्राम थोपटे,शशिकांत शिंदे,जयंत पाटील,श्रीमती दिपिका चव्हाण,सर्वश्री. वैभव पिचड, प्रदीप जाधव-नाईक, सुनिल प्रभू,हनुमंत डोळस, ॲड. आशिष*

*शेलार,सर्वश्री. नरेंद्र पवार,संजय केळकर,प्रशांत ठाकूर,ॲड. पराग अळवणी,कॅप्टन आर.तमिल सेल्वन,सर्वश्री. हसन मुश्रीफ,ॲड. वारीस पठाण,सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, अजित पवार,पांडुरंग बरोरा,डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. प्रशांत बंब, शेख आसिफ शेख रशीद, दत्तात्रय भरणे,भारत भालके, एकनाथराव खडसे-पाटील, अबु आजमी, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"रुग्णांच्या उपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तूंची विक्री छापील दरापेक्षा वाढीव दराने केल्याबद्दल मुंबईतील लीलावती, फोर्टीज, कोकिलाबेन अंबानी, एशियन हार्ट, ग्लोबल, हिरानंदानी व सर एच. एन. हॉस्पिटल या नामांकीत खाजगी रुग्णालयांवर शासनाच्या वैध मापनशास्त्र विभागाकडून माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेली कारवाई, वैध मापनशास्त्र अधिनियमातील तरतुदीनुसार वस्तूंवर आयातदाराचे नाव, महिना व वर्ष, ग्राहक सेवा क्रमांक, विक्री किंमत, उत्पादन महिना यासारख्या गोष्टींची माहिती छापील स्वरुपात असणे बंधनकारक असतानाही त्याची अंमलबजावणी न होणे, तसेच रुग्णालयात उपचारासाठी वापरण्यात येणा-या बलून डिव्हाईस, एंजिओग्राफीक कॅथ्रेटर, युरेटीक युरोवर्ल्ड, आयवी कॅथ्रेटर, गाइड वायर, ब्रेथिक सर्किट, हॅनसॅन ग्लोव्हज, ब्लड कलेक्टर, स्टेंट अशा वस्तू वाढीव दराने विकल्यामुळे रुग्णांची केली जात असलेली लुट, त्यामुळे या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(३) सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमित देशमुख, अमर काळे, अब्दुल सत्तार, मो.आरिफ नसीम खान, अमीन पटेल नितेश राणे, सुनिल प्रभू, शरद सोनावणे, पृथ्वीराज चव्हाण, कुमारी प्रणिती शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड.यशोमती ठाकूर, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, प्रा. विरेंद्र जगताप, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. विजय औटी, राहुल बोंद्रे, किसन कथोरे, संदीप नाईक, बळीराम सिरसकर, जितेंद्र आव्हाड, सरदार तारासिंह, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, पांडुरंग बरोरा, हसन मुश्रीफ, अबु आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"दापोडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील हरिहर कंम्पाऊंड मधील प्लास्टीकच्या दाण्यांपासून मोती बनविणाऱ्या देढीया प्लास्टीक या कारखान्यातील रसायनांच्या साठ्यास दिनांक १९ फेब्रुवारी,२०१७ रोजी शॉर्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत ४ कामगारांचा होरपळून झालेला मृत्यु व अन्य दोन कामगार गंभीररित्या जखमी होणे,*

*तसेच याच तालुक्यातील मु.पो.अनगाव येथील उदबत्ती व तीळापासून तेल तयार करणाऱ्या पितांबरी कारखान्यास लागलेल्या आगीत लाखो रुपयांचे झालेले नुकसान,तसेच अहमदनगर येथील एम.आय.डी.सी परिसरातील सनफार्मा कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या आगीत दोन कामगारांचा झालेला मृत्यु, सदर कारखान्यांनी कामगारांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही उपाययोजना केली नसल्यामुळे कामगारांचा झालेला मृत्यु, याबाबत कामगार आयुक्तांनी वेळोवेळी पाहणी करुन कामगारांच्या सुरक्षेबाबत कंपनीच्या व्यवस्थापनेला कळविणे आवश्यक असतानाही त्याकडे केलेले दुर्लक्ष, मृत कामगारांच्या सुरक्षेची काळजी न घेणाऱ्या कंपनीच्या मालकांवर गुन्हा दाखल करुन मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

पाच : *डॉ. अनिल बोंडे, सुभाष साळवे, डॉ.सुनिल देशमुख, डॉ. जयप्रकाश मुंदडा, श्री.राजेंद्र नजरधने, डॉ.राहूल पाटील, सर्वश्री राजेंद्र पाटणी, मनोहर भोईर, हरिभाऊ जावळे, शंभुराज देसाई, सुरेश हळवणकर, हेमंत पाटील, प्रा.अशोक उईके, श्री.संजय रायमुलकर, प्रा.राजु तोडसाम, सर्वश्री चंद्रकांत सोनावणे, उन्मेश पाटील, किशोर पाटील, समीर कुणावार, ज्ञानराज चौगुले, किसन कथोरे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री बाळासाहेब मुरकुटे, राजाभाऊ वाजे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-*

*"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठया प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठया प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य शासनाने लिफ (LTIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्ड कडून रक्कम रूपये १२,७७३ कोटी रूपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठया प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठया प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील पाच वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षावर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीज पुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठया प्रमाणावर अंमलात आणल्याने*

*रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पिक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीज पुरवठा व्हावा या दृष्टिने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टिने शेतकरी हा केंद्रबिंदु मानुन त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टिने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना."*

*सहा : शासकीय विधेयके :*

*विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबू आजमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपीका चव्हाण, श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---

--------

*(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबू आजमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई*

*महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.*"

*सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-*

*(गत सत्रात गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (क्रमांक १ )*

*(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.*

*"शासनाने क्रीडा स्पर्धासरावासाठी खेळाडूंना सवलत देण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावरील श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स यांचा दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १७७ मधील प्रश्न क्रमांक ३४६८१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.*

*(सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) ( क्रमांक २ व ३ )*

*(२) श्री.मनोहर भोईर, वि.स.स.*

*"उरण तालुक्यातील हुतात्म्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मारकांच्या दुरावस्थेबाबत" या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स यांचा दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक २५६ मधील प्रश्न क्रमांक ५३७३६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.*

*(३) श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.*

*"पलढग धरणावरील एक्सप्रेस कॅनालच्या कामासाठी निधी देण्याबाबत" या विषयावरील श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स यांचा दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ११३ मधील प्रश्न क्रमांक २१०९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ६ मार्च, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*